॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


✽ सुविचार ✽

शहाणपणाने घेतलेले निर्णय आयुष्य बदलून टाकतात.







■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २४ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ४२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### संपुर्ण हगवणे कुटुंबीय अटकेत

● **मुंबई** – पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणी राज्यभर खळबळ उडाली आहे. या प्रकरणात वैष्णवीचा पती, सासू आणि नणंद यांना आधीच अटक केली होती. पण सासरा आणि दीर फरार होते. दरम्यान, फरार असलेल्या राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे या दोघांना पोलिसांनी पहाटे अटक केली. या प्रकरणावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोल्हापूर दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यू प्रकरणी कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सीएम फडणवीस यांनी दिली. सीएम फडणवीस म्हणाले, आज सकाळीच अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन योग्य कारवाई केली आहे. पुढे हे प्रकरण तडीस घेऊन जाण्यापर्यंत जे काही करता येईल त्या गोष्टी पोलिस करतील असेही फडणवीस म्हणाले. अशा प्रकारे आत्महत्येला प्रवृत्ती करणे अशा गोष्टी सहन करणार नाही. कायद्याने जी काही कडक कारवाई करता येईल ती केली जाईल. मकोका लावण्याकरता त्यासाठी काही नियम आहेत. त्या नियमात बसले तर मकोका लागू शकेल. पण, नियमात बसेल की नाही हे आज सांगू शकत नाही, असंही सीएम देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### आरबीआयकडून सरकारला २.६८ लाख कोटींचा लाभांश

● **नवी दिल्ली** – मोदी सरकारला रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून २.६८ लाख कोटी रुपयांचा लाभांश जाहीर करण्यात आला. गेल्या वर्षी मध्यवर्ती बँकेकडून केंद्राला २.१ लाख कोटी रुपयांचा विक्रमी लाभांश दिला होता. रुपया स्थिर ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून मोठ्या प्रमाणात अमेरिकन डॉलर्सची विक्री केली आहे. अशातच या विक्रीतून चांगले उत्पन्न आले आहे. तसेच लिक्विडिटी ऑपरेशन्स अंतर्गत बँकांना मोठ्या प्रमाणात निधी दिल्यानंतर त्याबदल्यात व्याजाच्या स्वरुपात आरबीआयला नफा झाला. दरम्यान, आरबीआयला चांगले उत्पन्न मिळाल्याने केंद्राच्या मिळणाऱ्या लाभांशमध्ये वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेकडून मिळणारी रक्कम केंद्राच्या अर्थव्यवस्थेसाठी एक मोठा आधार आहे. चालू वर्षात सरकार अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी अधिक पैसे खर्च करण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेकडून सरकारला मिळणारा लाभांश वित्तीय तूट कमी करण्यासाठी महत्त्वाचा आहे. लाभांशद्वारे निधी मिळाल्यास सरकारला कर्ज उभारण्याची गरज उरत नाही. विरुद्ध ऐतिहासिक विनिमय दरातील फरकामुळे रुपयातील अस्थिरता कमी करण्यासाठी मध्यवर्ती बँकेने केलेल्या उपाययोजनांच्या प्रकाशात, आरबीआयच्या कमाईमध्ये, परकीय चलन व्यवहार सर्वात महत्त्वाचे असण्याची अपेक्षा आहे.

# शेतीच्या बांधावर १२ फुटाचा रस्ता अनिवार्य

## महसूल विभागाचे आदेश जारी । लाखो शेतकऱ्यांना होणार लाभ

● **मुंबई । वीरभूमी**–

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वातील महायुती सरकारकडून अनेक धडाकेबाज निर्णय घेतले जात आहेत. त्यातच चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महसूल विभागाचाही समावेश आहे. महसूल खात्याने एकापाठोपाठ एक अशा मोठ्या निर्णयांचा धडाकाच लावला आहे. अशातच आता त्यांनी शेतीतील वाद मिटवण्यासाठी बांधावरून जाणारा रस्ता यापुढे बारा फुटांचा असणार असल्याची घोषणा केली आहे. तसेच या रस्त्याची नोंद सातबारा उताऱ्यावर ९० दिवसांत करण्याचे आदेशही महसूल विभागाने जारी केले आहेत.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतर्कयांना शेतातून ट्रॅक्टर, रोटावेटर, हार्वेस्टर यांसारखी मोठी कृषी अवजड गोष्टी घेऊन जाण्यास मदत होणार नाही. या निर्णयामुळे शेत जमिन तसेच रस्त्यावरून होणारे संघर्ष टाळता येणार आहे. राज्य सरकारच्या आदेशात ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात शेत रस्त्याची नोंद झाल्यामुळे त्या रस्त्याची कायदेशीर वैधता स्थापित होईल व भविष्यात शेतरस्त्यांच्या वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. व जमीन खरेदी-विक्रीच्या वेळी संभाव्य खरेदीदाराला जमिनीवरील या महत्त्वाच्या हक्काची माहिती मिळेल असेही म्हटले आहे.

याचवेळी ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात शेतरस्त्याची नोंद घेण्याच्या अनुषंगाने संबंधित क्षेत्रीय अधिकारी/प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे कारवाई करण्याचे आदेशही दिले आहेत. तसेच शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा पूर्ण लाभ मिळवून देण्यासाठी म्हणजेच मोठे कृषी अवजारे (उदा. ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टर, इत्यादी) यांच्या वाहतुकीसाठी आणि शेतीमालाच्या जलद व सुरक्षित वहनासाठी शेतरस्त्यांबाबत शेतकऱ्याची मागणी व आवश्यकता, स्थानिक भौगोलिक परिस्थिती याबाबत संबंधित सक्षम अधिकारी/प्राधिकारी यांनी तपासणी करून पारंपारिक अरुंद शेतरस्त्यांऐवजी किमान ३ ते ४ मीटर रुंद असलेले शेतरस्ते उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही महसूल विभागाकडून



देण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांनी मागणी केलेल्या शेतरस्त्याच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन शेतरस्त्याची आवश्यकता तपासण्यात यावी. अस्तित्वात असलेले नैसर्गिक मार्ग, पाऊलवाटा, इतर वहिवाटीचे मार्ग तसेच स्थानिक भौगोलिक परिस्थिती पडताळणी करण्यात यावी. शेजारच्या भूधारकांच्या वहिवाटीच्या हक्कांचा आणि त्यांच्या अडचणींचा व आक्षेपांचा विचार करण्यात यावा असेही राज्य सरकारच्या आदेशात नमूद केले आहे.

सदर बाबी विचारात घेऊन वाढत्या यांत्रिकीकरणाच्या अनुषंगाने जर थेट योग्य रुंदीचा शेतरस्ता कोणत्याही कारणाने उपलब्ध करुन देणे शक्य नसेल परंतु रुंद शेतरस्त्याची आवश्यकता असेल तर इतर पर्यायी आणि सोयीस्कर मार्गाचा विचार करावा, जरी तो थोडा लांबचा असला तरी चालेल आणि ते देखील शक्य नसेल तर अपवादात्मक परिस्थितीमध्येच आवश्यकतेनुसार ३ ते ४ मीटर पेक्षा कमी परंतु जेवढा जास्त रुंद शेतरस्ता उपलब्ध करुन देणे शक्य असेल तेवढा उपलब्ध करुन द्यावा.

दोन शेतांच्या सीमा म्हणजे बांध नसून पाणी व्यवस्थापन आणि जमिनीची धूप थांबवण्यासाठी त्याचा महत्त्वाची भूमिका असतात. त्यामुळे बांधावरून रस्ता देतांना त्याचे नैसर्गिक स्वरूप शक्यतो टिकवून ठेवावे. रस्त्यांची रुंदी शेतीमध्ये वाढत्या यांत्रिकीकरणाच्या अनुषंगाने ठेवावी, परंतु अनावश्यक रुंदीकरण टाळावे. तसेच बांधावरून रस्ता दिल्यानंतर दोन्ही बाजूंच्या सीमांची निश्चिती करावी, जेणेकरून भविष्यात सीमांवरून कोणताही वाद निर्माण होणार नाही.

### महसूल विभागाचे महत्त्वाचे निर्णय

■ नुकताच महाराष्ट्र सरकारने देवस्थान वतन जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांवरील नोंदणी प्रक्रिया तत्काळ थांबविण्याचे निर्देश दिले आहेत. पुणे येथील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या उपमहानिरीक्षक कार्यालयातून जारी झालेल्या परिपत्रकानुसार, शासन धोरण ठरविण्यात येईपर्यंत कोणत्याही देवस्थान इनाम मिळकतींच्या दस्तऐवजांची नोंदणी करता येणार नाही.

■ शासन धोरण येईपर्यंत देवस्थान जमिनींचे व्यवहार थांबवा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी विभागास दिले आहेत. फक्त न्यायालयीन आदेश किंवा अधिकृत मंजुरी असलेल्या जमिनींचेच दस्त नोंदणीस मान्यता देण्यात येणार आहे.

■ या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण आता राज्यातील जमिनींची हिस्सेवाटप मोजणी अवघ्या २०० रुपयांमध्ये होणार आहे.याआधी शेत जमिनींच्या हिस्सेवाटपाच्या मोजणीसाठी किमान एक हजार रुपये ते चार हजार रुपये मोजावे लागत होते.

# मंत्री छगन भुजबळांना अन्न व पुरवठा विभागाचे खाते

● **नाशिक । वीरभूमी**–

नुकतीच मंत्रिपदाची शपथ घेतलेले राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना अखेर खात्याची जबाबदारी मिळाली आहे. शिंदे सरकारमध्ये त्यांच्याकडेच असलेले परंतू, मध्यंतरी धनंजय मुंडेंकडे फिरून आलेले अन्न व नागरी पुरवठा खाते पुन्हा भुजबळ यांच्याकडे आले आहे.

छगन भुजबळ हे मंगळवारी मंत्रिपदाची शपथ घेतील असे सोमवारी सायंकाळी सांगण्यात आले होते. मुंडे यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा खाते होते. तेच खाते भुजबळ यांच्याकडे दिले जाईल असे कयास बांधले जात होते. हे खाते मुंडेंना राजिनामा द्यावा लागल्याने अजित पवारांकडे होते. राज्यात भाजप-शिंदेसेना आणि अजित पवार गटाचे सरकार आल्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या विस्तारावेळी भुजबळ यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली नव्हती. तेव्हापासून ते नाराज होते. आपली नाराजी त्यांनी अनेकदा बोलून दाखविली होती. भुजबळ हे अजित पवार गटातील एक मोठा ओबीसी चेहरा मानले जातात. यामुळेच येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भुजबळांना जवळ करण्यात आले आहे.

खातेवाटप झाल्याचा फोन येताच भुजबळ लगेचच मुंबईला रवाना झाले आहेत. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना भुजबळ म्हणाले की, सरकारी आदेश निघाल्याचे मला आताच कळले. मी लगेचच मुंबईला जात असून चार्ज घेत आहे. खात्याच्या सचिव, अधिका-यांची बैठक घेणार असून त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यात येणार आहे. हे माझेच खाते होते. मंत्रिमंडळात समावेश न झाल्याने ते धनंजय मुंडे यांच्याकडे गेले होते. ते पुन्हा माझ्याकडे आले आहे. मी मंत्री असताना शेवटच्या गावापर्यंत, प्रत्येक दुकानात अन्य धान्य पोहोचवले होते, पुढे घोटाळा होऊ नये यासाठी प्रयत्न असणार आहेत, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी दिली.

# रविवारी मान्सून केरळात दाखल होणार

● **पुणे । वीरभूमी**–

भारतीय अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेल्या मान्सूनसंदर्भात अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची बातमी आहे. भारतीय हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार यंदा मान्सून वेळे आधीच रविवारी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार सध्या मान्सूनसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे येत्या २५ मे पर्यंत मान्सून हा केरळच्या किनारपट्टीवर दाखल होऊ शकतो. गेल्या वर्षी ३० मार्च रोजी मान्सूनची केरळमध्ये एन्ट्री झाली होती.

मात्र यंदा वेळेपूर्वीच म्हणजे २५ तारखेला मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २००९ साली केरळमध्ये वेळेआधी मान्सून दाखल झाला होता, त्यानंतर आता तब्बल १६ वर्षांनी वेळेपूर्वीच मान्सून केरळमध्ये दाखल होणार आहे.

पंधरा जूनपर्यंत देशातील बहुतांश भागात मान्सूनने व्यापण्याची शक्यता आहे. दरम्यान यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. यंदा भारतामध्ये सरासरी १०७ टक्के पाऊस पडू शकतो असा अंदाज आहे. हवामान खात्यानं वर्तवलेल्या पावसाच्या अंदाजानंतर शेतक-यांना मोठा दिलासा मिळाला असून पेरणीपूर्व मशागतींना अनेक भागांमध्ये वेग आला आहे.

येत्या २५ मे पर्यंत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे, त्यानंतर पुढील काही दिवसांमध्ये मान्सूनची एन्ट्री दक्षिण भारत आणि मध्य भारतात होणार आहे, मात्र याच दरम्यान दक्षिण कोकण आणि गोव्याच्या समुद्र किना-यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. यामुळे महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये सध्या जोरदार अवकाळी पाऊस सुरू आहे. पुढील ३६ तास महत्त्वाचे असून आयएमडीकडून राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.


!! सुवर्ण संधी!! !! सुवर्ण संधी!! !! सुवर्ण संधी!!

ग्रामीण भागातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांकरिता शासनाच्या विविध स्पर्धा परीक्षेत स्व:परिश्रमाने यशस्वी होण्याकरिता सुवर्ण संधी !!!

**श्री. मधुकर बयाजी ठवाळ**

सहा. पोलीस आयुक्त (सेवानिवृत्त), मुंबई,

यांनी त्यांचे गावी,

**मु. पो. आढळगाव,**

ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर (अहमदनगर) येथे




**अमित बेनेवोलेन्ट**

**करिअर डेव्हलपमेंट फाउंडेशन**

नावाची गरीब, गरजू विद्यार्थ्यांकरिता सेवाभावी संस्था स्थापन केली आहे. त्यानुसार गरीब विद्यार्थ्यांकरिता शासनाच्या विविध स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारी करीता खालील नमुद सवलती विनामूल्य देण्यात येत आहे.

१. ज्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षे करिता अर्ज सादर केला असेन अशा सर्व विद्यार्थ्यांकरिता रहाण्याची तसेच मोफत लायब्ररीची सोय करण्यात येईल.

२. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता उपरोक्त सवलती सह जेवणाची मोफत सोय करण्यात येईल.

✽ संपर्क ✽

**गौरव ठवाळ** मो. ८०९७४१७३३१

**मधुकर ठवाळ** मो. ७५०६९००१७३

# SPOT NEWS

## दिव्यांग संगणक परिचालकाचा अन्यायकारक निलंबनप्रकरणी प्रहार दिव्यांग संघटना आक्रमक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
वडझिरे (ता. पारनेर) ग्रामपंचायतीत कार्यरत असलेल्या दिव्यांग संगणक केंद्र चालक राजेश शिवाजी शेंडकर यांना कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता अचानकपणे बेकायदेशीररीत्या निलंबित करण्यात आले आहे. या अन्यायकारक निर्णयाविरोधात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष ड. लक्ष्मण पोकळे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन शेंडकर यांना तात्काळ सेवेमध्ये पुन्हा समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. राजेश शेंडकर हे २०१८ पासून वडझिरे ग्रामपंचायतीमध्ये संगणक केंद्र चालक म्हणून प्रामाणिकपणे सेवा देत आहेत. शेंडकर व त्यांची पत्नी दोघेही दिव्यांग असून त्यांच्यावर आजवर कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही. मात्र, ग्रामपंचायतीने पदाचा गैरवापर करून बिनबुडाच्या आरोपांच्या आधारे त्यांचे निलंबन केले आहे. विशेष म्हणजे, या निलंबनापूर्वी त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नाही, तसेच कोणतीही कायदेशीर सुनावणी देखील झालेली नाही. शेंडकर कुटुंब पूर्णपणे या नोकरीवर अवलंबून आहे. त्यांच्या निलंबनामुळे दोघा दिव्यांग पती–पत्नीसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. आजवर कोणताही दोष नसताना केवळ वैयक्तिक द्वेषातून त्यांच्यावर अन्याय झाला असल्याचा आरोप स्थानिक संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. राजेश शेंडकर यांना तत्काळ सेवेत समाविष्ट करण्यात यावे, अन्यथा दिव्यांग बांधवांवर होणाऱ्या या अन्यायाविरुद्ध प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष ॲड. पोकळे यांनी दिला आहे.

## दोघांना गावठी कट्ट्यासह पकडले

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
पाथर्डी परिसरात खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात पसार असलेल्या दोन संशयित आरोपींना गावठी कट्टा व जिवंत काडतुसे विक्रीसाठी बाळगत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. सदर कारवाई बुधवारी (२१ मे) माणिकदौंडी चौक, पाथर्डी येथे करण्यात आली असून, त्यांच्याकडून एक लाख ४० हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून अवैध अग्नीशस्त्रे व हत्यारे बाळगणाऱ्या इसमांविरोधात कारवाईची मोहीम सुरू आहे. गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, मुदस्सर सादीक सय्यद (वय २२, रा. पाथर्डी) व सोमनाथ रमेश काळोखे (वय २४, रा. आनंदनगर, पाथर्डी) हे दोघे संशयित इसम माणिकदौंडी चौकात गावठी कट्टा विक्रीसाठी येणार असल्याचे समजताच पथकाने तत्काळ कारवाई करत त्यांना अटक केली. त्यांच्याकडून एक गावठी कट्टा, दोन जिवंत काडतुसे, चार मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण एक लाख ४० हजार ४०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस तपासात उघड झाले की, हे दोघेही पाथर्डी पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात पसार संशयित आरोपी होते. याशिवाय त्यांच्यावर नव्याने पाथर्डी पोलीस ठाण्यात आर्म ॲक्ट कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहीद संदीप गायकर यांचे ब्राम्हणवाडा येथे स्मारक उभारावे

## ज्ञानेश्वर गायकर पाटील यांची पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचेकडे मागणी

**अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुक्यातील शहीद मेजर संदीप पांडुरंग गायकर यांचे ब्राह्मणवाडा येथे राज्य सरकारने हुतात्मा स्मारक करावे, तसेच वाचनालयसह सैन्य पूर्व भरती प्रशिक्षण केंद्र उभारणी, करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त सेलचे राज्य कार्यकारी प्रमुख ज्ञानेश्वर गायकर पाटील यांनी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

जम्मू काश्मीर मधील चतरू येथील सिंगपोरा येथे दिनांक २२ मे २०२५ रोजी, भारतीय सुरक्षा दल व पाकचे दहशतवादी यांच्यात चकमक होऊन, महाराष्ट्रातील, अहिल्यानगर येथील दुर्गम अश्या अकोले तालुक्यातील पठार भागातील, पुणे जिल्हा सीमेवरील ब्राह्मणवाडा येथील ३२ वर्षीय संदीप पांडुरंग गायकर हे शहीद झाले असून, गरीब कुटुंबातील ह्या तरुण जवानाच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्र हळहळ व्यक्त करत आहेत.



बेताची कौटुंबिक परिस्थिती असलेले शहीद संदीप पांडुरंग गायकर यांना दीड वर्षाचा मुलगा असून, आई वडील यांना एकुलता एक मुलगा होता. या परिवारास अवघी २० गुंठे शेतजमीन आहे. शहीद संदीप यांच्या निधनाने ह्या कुटुंबावर हलाखीचे संकट निर्माण झाले असून, सरकारने ह्या कुटुंबाला आधार म्हणून शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याची मागणीही गायकर यांनी केली आहे.

शहीद जवान संदीप गायकर यांचे, स्पूर्तिदायक स्मारक दुर्गम ब्राह्मणवाडा गावात उभारण्यात यावे. या ठिकाणी वाचनालय अथवा अभ्यासिका निर्माण करण्यासाठी राज्य सरकार ने पुढाकार घ्यावा. सरकारी जागेत त्यांचे स्पूर्तिदायक स्मारक उभारण्यात यावे. या करिता राज्य सरकारचे प्रतिनिधी तसेच पालक मंत्री म्हणून आपण पुढाकार घ्यावा, अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्ष तसेच ब्राम्हणवाडा ग्रामस्थ यांचे वतीने गायकर यांनी केली.

अहिल्यानगरचे पालकमंत्री म्हणून, हा प्रस्ताव राज्य सरकारकडून मंजूर करून घ्यावा, असे साकडे ही श्री. गायकर यांनी ना.विखे पाटील घातले आहे.

शहीद संदीप गायकर यांचे हे स्मारक पुढील काळात नक्कीच तरुणांना प्रेरणा देईल. शहीद संदीप गायकर यांच्या हुतात्मा नंतर, कौटुंबिक स्थिती जी निर्माण झाली आहे, त्याची सरकारने गंभीर दखल घ्यावी अशी विनंती करत शहीद जवान संदीप गायकर यांच्या पत्नीस सरकारी नोकरी देण्यात यावी. दीड वर्षाच्या मुलाचे व वयोवृद्ध आई वडिलांचे पुनर्वसन सरकारने करावे, अशी आग्रहाची विनंती राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्ष तसेच ब्राम्हणवाडा ग्रामस्थ यांचे वतीने गायकर यांनी केली आहे.

# नगर शहरात घर देण्याच्या नावाखाली साडेसहा लाखांची फसवणूक

## भाचे जावयाविरोधात गुन्हा दाखल

**नगर । वीरभूमी –**
घर घेऊन देतो, असे आमिष दाखवून तब्बल सहा लाख ५० हजार रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी राजेश्वर मनोहर भोसले (वय ४४, रा. बालिकाश्रम रस्ता, सुडके मळा, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात गुरूवारी (२२ मे) फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, संकेत राजेंद्र भोसले (रा. पिंपळगाव माळवी, ता. अहिल्यानगर) हा फिर्यादी राजेश्वर भोसले यांचा भाचे जावई आहे. त्याने मी तुम्हाला २२ लाख रूपयांत घर घेऊन देतो असे सांगून राजेश्वर यांचा विश्वास संपादन केला. २९ डिसेंबर २०२३ ते १३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत वेळोवेळी फोन पेव्दारे चार लाख ४७ हजार रूपये आणि रोख दोन लाख तीन हजार रूपये, असे एकूण सहा लाख ५० हजार रूपये घेतले.

पैसे दिल्यानंतर देखील संकेतने कोणतेही घर दाखवले नाही. अनेक वेळा पैशांची मागणी केल्यानंतर त्याने २८ मे २०२४ रोजी सहा लाख ५० हजार रूपयांचा एचडीएफसी बँकेचा चेक आणि रोख २० हजार रूपये दिले. त्यानंतर पुन्हा एकदा सहा लाख ३० हजार रूपयांचा जिल्हा सहकारी बँकेचा चेक दिला, मात्र दोन्ही चेक बाउन्स झाले. त्यामुळे पैसे परत मिळाले नाहीत.

राजेश्वर यांना समजले की, संकेत याने बोगस कोरे चेक देऊन फसवणूक केली असून पैसे देण्याचे टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे त्यांनी पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता आणि आता कायदेशीर फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार गोरडे करीत आहेत.

# छत्रपती शिवाजी महाविद्यालय आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यात सामंजस्य करार

**श्रीगोंदा । वीरभूमी–**
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार संपन्न झाला. या करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी आणि केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी स्वाक्षरी केली. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर विविध कार्यक्रम राबवले जातात.



या उपक्रमाच्या विस्तारासाठी पुणे विभागातील करिअर कट्टा संलग्न महाविद्यालयांची सहविचार सभा २२ मे २०२५ रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयात पार पडली. सभेचे उद्घाटन यूजीसी एमएमटीटीसीचे संचालक डॉ. संतोष केंद्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ. नितीन घोरपडे, अहिल्यानगरचे प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, डॉ. राजधर टेमकर, प्राचार्य भाऊसाहेब देशमुख, गर्जे मराठी ग्लोबलचे राज्यस्तरीय सदस्य डॉ. विलास सुद्रिक, करिअर कट्टा समन्वयक डॉ. विजय इथापे, पुणे जिल्हा समन्वयक डॉ. संजय खिलारे, अहिल्यानगर जिल्हा समन्वयक डॉ. नवनाथ नागरे, डॉ. भागवत परकाळ तसेच इतर महाविद्यालयीन समन्वयक आणि विद्यार्थी समिती सदस्य उपस्थित होते.

या करारामुळे १०० देशांतील मराठी उद्योजक विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून, कौशल्याधारित कोर्सेसचा लाभ छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना होणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी दिली. या करारामुळे करिअर कट्टा अंतर्गत विद्यार्थी केंद्रित उपक्रमांना गती मिळणार आहे. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे, उपाध्यक्ष बाबासाहेब भोस, जिल्हा बँक संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, सर्व विश्वस्त, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या.

# भारत महोत्सवात अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजला चॅम्पियनशिप

**संगमनेर । प्रतिनिधी–**
अखिल भारतीय कल्चरल ऑर्गनायझेशन भारत महोत्सव २०२५ या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन दिनांक १६ मे ते २२ मे या दरम्यान पुणे येथे करण्यात आले होते. या महोत्सवात अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व जुनियर कॉलेजमधील ८२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्याचे पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरूड, पुणे. या ठिकाणी २२ मे २०२५ रोजी समारंभ संपन्न झाला.




त्यातील विविध स्पर्धांत संगमनेर येथील अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील एकूण ८२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून स्पर्धेत १७ बक्षीसांसह भारत महोत्सव २०२५ ची चॅम्पियनशिप मिळवली आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत २००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रशांत त्रिभुवन लिखित व दिग्दर्शित मूकनाट्य (सांघिक द्वितीय, तृतीय) समूह लोकगीत (सांघिक द्वितीय, तृतीय) गायन (सांघिक द्वितीय, तृतीय) एकांकिका (सांघिक द्वितीय , तृतीय) एकपात्री अभिनय (प्रथम: अन्वी फटांगरे; प्रथम: वैष्णवी पारधी), एकल नृत्य (प्रथम: संबोधी आहेर) समूह नृत्य (द्वितीय, तृतीय) एकल वादन भारतीय (प्रथम: क्षितिज मुसळे) एकल वादन पाश्चिमात्य (प्रथम: देवांश दारोळे) एकल गायन (प्रथम: श्राव्या सहाने; तृतीय: स्वरा बोरकर) या विविध कलाप्रकारात १७ पारितोषिके मिळवून राष्ट्रीय स्तरावर विजेतेपद मिळवून आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे द्वार खुले केले.

या पारितोषिक वितरण समारंभास नृत्यदिग्दर्शक श्री. वैभव घुगे यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले व मार्गदर्शन केले. या समारंभास भारत देशातील विविध राज्यांतील स्पर्धक, स्पर्धेला लाभलेले परीक्षक, ऑर्गनायझेशन चे सदस्य उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम केले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने या सांस्कृतिक महोत्सवात सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांना शाळेचे शिक्षक प्रशांत त्रिभुवन व सांस्कृतिक समितीच्या सदस्यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे काँग्रेसचे राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात, संस्थेच्या विश्वस्त सौ. शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ यांनी अभिनंदन केले आहे.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानतर्फे रोजगाराची सुवर्णसंधी

## असंख्य युवक युवतींना मिळणार रोजगार

**कोपरगाव । वीरभूमी –**
संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून कोपरगाव तालुका व परिसरातील युवक–युवतींसाठी एक अतिशय महत्त्वपूर्ण आणि सुवर्णसंधी पुन्हा एकदा उपलब्ध झाली आहे. याअंतर्गत पुणे येथील नामांकित मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये (MNC) थेट भरतीची संधी निर्माण करण्यात आली आहे अशी माहिती देण्यात आली आहे.

या रोजगार मेळाव्याच्या आयोजनामागे युवानेते मा. विवेकभैय्या कोल्हे यांचे दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या प्रयत्नांतून आजवर हजारो युवकांना संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या रोजगार उपक्रमांद्वारे स्थायिक नोकऱ्या मिळाल्या आहेत. या उपक्रमाद्वारे अनेक कुटुंबांचा आर्थिक कणा मजबूत केला आहे.

या वेळीही पुणे येथील नामांकित कंपन्यांमध्ये डिप्लोमा इन मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन (E TC) असलेल्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे. वयाची अट १८ ते ३० वर्षांपर्यंत असून, एकत्रित पगार १९,००० ते २५,००० पर्यंत मिळणार आहे.




डबल ओव्हरटाईम, ट्रान्सपोर्ट व कँटीन सुविधा देखील गरजेनुसार उपलब्ध करून दिली जाईल.

रोजगार मेळाव्याची तारीख: २८ मे २०२५ असून वेळ: सकाळी ९:३० वाजता आहे तर ठिकाण: सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लि., नवीन बिल्डिंग सभागृह, सहजानंदनगर, कोपरगाव येथे ठेवण्यात आले आहे.

सर्व उमेदवारांनी QR कोड स्कॅन करून फॉर्म भरणे आवश्यक आहे. सिलेक्ट झालेल्या उमेदवारांना ऑफर लेटर ई–मेलवर पाठवण्यात येईल. मुलाखतीसाठी येताना शैक्षणिक कागदपत्रे सोबत आणावीत. अधिक माहितीसाठी संपर्ककरण्यासाठी८१८१९०९०९० / ८३२९२१४७१९ हे क्रमांक देण्यात आले आहेत.

# अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दीनिमित्त भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

**नगर । वीरभूमी–**
राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे विचार समाजाला प्रेरणादायी व आदर्शवंत आहे. त्यांचा प्रसार व प्रचार व्हावा यासाठी समाजामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन होणे गरजेचे आहे. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म आपल्या जिल्ह्यामध्ये झाला असून त्यांचे नाव देखील आपल्या जिल्ह्याला दिले आहे. नगर दक्षिण भाजपाच्या वतीने दिनांक २६ मे रोजी सकाळी दहा वाजता सहकार सभागृह येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी दिली.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त नगर दक्षिण भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून नियोजनाच्या बैठकीत बोलताना भाजपाचे युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय कर्डिले, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग समवेत बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, दादाभाऊ चितळकर, अण्णासाहेब बाचकर, मधुकर मगर, संतोष म्हस्के, रेवणनाथ चोभे, राम पानमाळकर, डी. आर. शेंडगे, सुधीर भापकर, बाबासाहेब खडसे, दीपक कार्ले, दादा दरेकर, सुभाष निमसे, भैय्या लांडगे, हर्षल म्हस्के, गणेश भालसिंग आदी उपस्थित होते.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी दिनानिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसे च विविध मान्यवर कर्जत तालुक्यातील चोंडी येथे ३१ मे रोजी उपस्थित राहणार आहे अशी माहिती भाजपाचे युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी दिली

नगर दक्षिण भाजपाच्या वतीने राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त समाजामध्ये चांगले काम करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जाणार आहे.तसेच दहावी बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा गावाच्या विकासासाठी योगदान असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी दिली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## जिल्हा न्यायालयात बार असोसिएशनच्या वतीने निषेधाचा ठराव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मुंबई भेटी दरम्यान सरकारी अधिकाऱ्यांकडून राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल जिल्हा न्यायालयात अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने निषेधाचा ठराव घेण्यात आला. विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांच्या अध्यक्षतेखाली बार असोसिएशनने तातडीची बैठक बोलवली होती. यामध्ये सरन्यायाधीश गवई यांच्या भेटी दरम्यान राजशिष्टाचाराचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांचा निषेध करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी असा ठराव संमत करण्यात आला. ठराव ॲड. महेश काळे यांनी मांडला. त्याला बारच्या वतीने ॲड. रफिक बेग यांनी अनुमोदन दिले. यावेळी ॲड. राजेश कावरे, माजी उपाध्यक्ष ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. रावसाहेब बर्डे, ॲड.पी. डी. शहाणे, ॲड. हाजी रफिक बेग, ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. ज्ञानेश्वर दाते, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. महेश काळे, ॲड. रघुनाथ शेळके, ॲड. वरद शिंदे, ॲड. अशोक पालवे, ॲड. समीर शेख, ॲड. संजय दराडे, ॲड. सतीशचंद्र सुद्रिक, ॲड. योगेश थोरात, ॲड. साबीर सय्यद, ॲड. बाबासाहेब रणसिंग, ॲड. व्ही. एस. शिंदे आदींसह वकील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. न्यायमुर्ती गवई हे महाराष्ट्रातील एकमेव न्यायमूर्ती असून, त्यांची एवढ्या मोठ्या उच्च पदावर सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती होणे ही सर्व महाराष्ट्रासाठी भूषणावह बाब आहे. एवढ्या मोठ्या उच्च पदस्त न्यायमूर्तींबाबत राज शिष्टाचार पाळला जाऊ नये, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. राज शिष्टाचार न पाळणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी यांना दोषी धरून त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## नगर शहरातून दोन व्यक्ती बेपत्ता

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
शहरातील दोन वेगवेगळ्या भागांमधून दोन व्यक्ती बेपत्ता झाल्याच्या घटना समोर आल्या असून, कोतवाली पोलीस ठाण्यात यासंदर्भात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. पहिली घटना झेंडीगेट परिसरातील आहे. वसीम रफिक तांबोळी (वय ३२ रा. बेपारी मोहल्ला, झेंडीगेट) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे चुलते फारूक हसन तांबोळी (वय ६०) हे ९ मे २०२४ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास कोणालाही काहीएक न सांगता घरातून निघून गेले. त्यानंतर त्यांनी माळीवाडा, झेंडीगेट परिसर तसेच शहरात व नातेवाईकांकडे शोध घेतला, परंतु ते कोठेही मिळून आले नाहीत. २१ मे रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. दुसरी घटना केडगाव परिसरातील असून, प्रकाश बाळासाहेब सांगळे (वय ६० रा. सरोदे मळा, केडगाव) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा रवींद्र प्रकाश सांगळे (वय ४२ रा. सरोदे मळा, केडगाव) हा १७ मे सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास दुध डेअरीवर कामासाठी गेला होता. रात्री ९.३० वाजता घरी जेवणासाठी आला आणि त्यानंतर १० वाजता कोणालाही न सांगता घरातून निघून गेला. त्यानंतर रवींद्र यांचा परिसरात, नातेवाईकांकडे तसेच डेअरीवर विचारपूस करून शोध घेतला असता तो मिळून आलेला नाही. २१ मे रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# मुसळधार पावसाच्या शक्यतेने ‘महावितरण’कडून उपाययोजना

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने राज्यभरात पुढील तीन ते चार दिवस वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने यंत्रणेसाठी हाय अलर्ट जाहीर केला आहे. या कालावधीसह पावसाळ्यातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आपत्कालिन नियोजन करण्यात आले आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी (दि. २३) राज्यातील वीज पुरवठ्याचा आढावा घेतला. नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा तातडीने सुरू करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, मुख्यालय व परिमंडलस्तरावर २४७ आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची लगेचच स्थापना करावी. कोणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश चंद्र यांनी दिले. व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या या बैठकीमध्ये संचालक (संचालन) सचिन तालेवार यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते उपस्थित होते.

यंदा मान्सूनच्या आगमनापूर्वीच राज्यात वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची दररोज हजेरी सुरू आहे. अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र सध्या स्थिर असले तरी त्याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या परिस्थितीमध्ये सुरळीत वीजपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी ही बैठक झाली. दरम्यान, शुक्रवार (दि. २३) पासून मुख्यालय व राज्यातील आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षांचे कामकाज सुरू झाले आहे.




अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक चंद्र म्हणाले, वीजपुरवठा खंडित झाल्यास तो तातडीने व वेळेत सुरू करण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. एखाद्या ठिकाणी दुरुस्ती कामाला वेळ लागणार असेल तर त्याबाबत संबंधित ग्राहकांना एसएमएसद्वारे, व्हॉटस् अप ग्रुप्स, ट्वीटर व सोशल मिडिया, प्रसिद्धी माध्यमांद्वारे ताबडतोब कळविण्यात यावे. खंडित वीजपुरवठ्याच्या कालावधीबाबत मुख्यालयाकडून पर्यवेक्षण करण्यात येत आहे. शक्य असूनही वीजपुरवठा वेळेत सुरू झाला नाही, तर त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही. त्यासाठी क्षेत्रीय वरिष्ठ अभियंत्यांनी मोठ्या व गंभीर बिघाडाच्या ठिकाणी स्वतः जाऊन दुरूस्ती कामांना वेग द्यावा. तसेच महावितरणच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये असे स्पष्ट निर्देश चंद्र यांनी दिले.

वादळवारा व मुसळधार पावसामुळे वीज यंत्रणेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक परिमंडल स्तरावर विजेचे खांब, रोहित्र, वीजतारा, ऑईलसह इतर यंत्रसामग्री उपलब्ध ठेवावी. पावसामुळे नादुरुस्त झालेल्या वीज यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी संबंधित अभियंते, कर्मचाऱ्यांना तसेच सर्व एजन्सींना मनुष्यबळ, सामग्री व वाहनांसह युद्धपातळीवर तयार राहण्याची सूचना श्री. लोकेश चंद्र यांनी केली. या पद्धतीने मान्सूनच्या आगमनानंतर पावसाळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी महावितरणच्या यंत्रणेने सज्ज राहावे असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच काम करत असताना सुरक्षा संबंधी सर्वोतोपरी काळजी घेण्याचे निर्देशही देण्यात आले. नगरमध्ये विजेचा लपंडाव नगरमध्ये गेल्या दोन दिवसापासून विजेचा लपंडाव सुरू आहे. विशेष करून वादळ आणि पावसानंतर नगर शहरातील, उपनगरातील एमआयडीसी भागात विज गायब होण्याच्या घटना वाढतांना दिसत आहे. दरवर्षी पावसाळ्यात हा प्रकार सुरु असून यामुळे नागरिक त्रस्त दिसत आहेत. यंदा अवकाळी पावसाच्या सुरूवातीलाच विजेचा लपंडाव वाढला असून महावितरणने अखंड वीजपुरवठा सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी होत आहे.

## मारहाण करत डॉक्टरला मारहाण करुन पैशांची मागणी
### रोकडसह, मोबाईल लुटला

**● श्रीरामपूर । प्रतिनिधी–**
शहरातील सेंट लुक हॉस्पीटल जवळ बीएचएमएस शिक्षण घेतलेल्या २८ वर्षीय डॉक्टर तरूणाला पैशांची मागणी करत मारहाण करत त्याचे ४ दात पाडून त्याच्याकडील रोकड व मोबाईल लुटून नेला.

अहिल्यानगर येथील विवेकानंद मेडिकल इन्स्टिटयुट ऑफ इलेक्ट्रोपॅथी अँड रिसर्च सेंटर येथे बीएचएमएसच्या तिसर्या वर्षात शिक्षण घेत असलेले प्रसाद जालिंदर पर्हे हे आपले मित्र प्रमोद त्रिभुवन, प्रतीक नरवडे यासमवेत मोटारसायकल घेवून नेवासा रोडवरील मित्र सुनील मोरे यांच्या बांबूच्या दुकानात गेले होते. सुनील हे बाहेरगावी असलेले फोनवरून कळाले. त्यानंतर पर्हे हे तेथून निघून जात असताना सुनील यांच्या दुकानात बसलेले मुलं त्यांच्याजवळ आले आणि शिवीगाळ करत पैशांची मागणी केली, तेव्हा




पर्हे यांनी पैसे नसल्याचे सांगताच दुकानातील बांबूने त्यांना व त्यांच्या मित्राला मारायला सुरुवात केली.

तेव्हा ते तेथून पळत सेंट लुक हॉस्पीटलजवळ गेले, त्यानंतर मोटारसायकलवरून चौघेजण तेथे आले आणि त्यांनी पैशांची मागणी करत प्रसाद पर्हे यांना लाकडी बांबू, फायटर तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

याप्रकरणी अज्ञात चौघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक नीतीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर शहर पोलिस करीत आहेत.

### कोपरगाव शिर्डी औद्योगीक वसाहतीसाठी
## माजी आ. स्नेहलताताई कोल्हे यांची मुख्यमंत्र्यांकडे प्रशिक्षण केंद्राची मागणी

**● कोपरगाव । वीरभूमी–**
तालुक्यातील सोनेवाडी – शिर्डी येथे औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत मा.आ.सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विशेष मागणी केली आहे. यामध्ये एमआयडीसी केंद्रात सेंटर फॉर इव्हेशन, इनोव्हेशन आणि इक्युबेशन अँड ट्रेनिंग सेंटर उभारण्याची विनंती केली आहे.

शिर्डी परिसरात औद्योगिक विकासासाठी पोषक वातावरण असून, सध्या अनेक नामांकित औद्योगिक कंपन्यांनी येथे गुंतवणूकिस सुरुवात केली आहे. ‘डिफेन्स क्लस्टर’ सारखा प्रकल्प राज्य शासनाने मंजूर केला आहे. भविष्यात येथे रोजगार निर्मितीची नवी दालने खुली होतील. या पार्श्वभूमीवर सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांना पत्राद्वारे सादर केलेल्या मागणीमध्ये म्हटले आहे की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने युवकांना स्किल डेव्हलपमेंटसाठी आवश्यक प्रशिक्षण देणारे इक्युबेशन व ट्रेनिंग सेंटर उभारण्यात यावे यामुळे आर्टिफिशल इंटेलिजन्स (ए. आय.) सारख्या आधुनिक प्रशिक्षण मिळून कौशल्य वृद्धी होणार आहे.

शिर्डीच्या जवळ विमानतळ, समृद्धी महामार्ग, उच्च दर्जाच्या प्रवास आणि निवास सुविधा आदींच्या सुविधांमुळे येथे देशी–विदेशी उद्योगांना आकर्षित करण्याची क्षमता आहे. या औद्योगिक विकासामुळे केवळ रोजगारच नव्हे तर स्थानिक स्तरावरील व्यवसाय आणि उद्योग वृद्धिंगत होतील. एमआयडीसीच्या माध्यमातून शिर्डी आणि परिसरात एक प्रगत, स्मार्ट औद्योगिक हब उभे राहण्याची संधी आहे.

या पत्राद्वारे सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनी शिर्डीसाठी मांडलेली ही मागणी फक्त विकासाचे नव्हे, तर आत्मनिर्भरतेचे प्रतीक ठरू शकते. गेल्यां चार महिन्यात राज्यात चार केंद्र मंजूर करण्यात आले आहे त्या धर्तीवर या मागणीचा सकारात्मक विचार व्हावा. कोपरगाव तालुक्यातील व शिर्डी परिसराची ओळख नव्या औद्योगिक युगाचे प्रवेशद्वार ठरावे, हीच त्यामागची दूरदृष्टी आहे. राज्य सरकारने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद द्यावा अशी अपेक्षा कोल्हे यांनी व्यक्त केली आहे.

# महसूलमंत्र्यांच्या धडाडीच्या निर्णयामुळे शिवपाणंद शेतरस्ता चळवळीला यश
### शरद पवळे व दादासाहेब जंगले यांच्या प्रयत्नांना यश

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या धडाडीच्या निर्णयांमुळे राज्यातील शेतरस्त्यांच्या ज्वलंत प्रश्नावर ऐतिहासिक तोडगा निघाला आहे. चळवळीचे प्रणेते शरद पवळे आणि राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी ‘शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी’ या अभियानांतर्गत राज्यभर जनजागृती करत शेतरस्त्यांच्या समस्येसाठी ग्राम, तालुका, जिल्हा आणि राज्य प्रशासनाकडे निवेदने आणि आंदोलनांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. या लढ्याची दखल घेत महसूलमंत्र्यांनी तातडीने कार्यवाही सुरू केली. मंत्रालयात मुंबई येथे चळवळीच्या पदाधिकाऱ्यांसोबत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन बावनकुळे यांनी शेतरस्त्यांसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

यामध्ये शेतरस्त्यांसाठी मोफत पोलिस संरक्षण, शेतरस्त्यांची ७/१२ उताऱ्यावर ‘इतर हक्क’अंतर्गत नोंद, पोटहिस्स्यासाठी




मोजणी शुल्क २०० रुपये इतके कमी करणे, आकारी, पड जमिनी शेतकरी आणि वारसांना चालू वर्षाच्या बाजारमूल्याच्या ५% रक्कम शासनाकडे जमा केल्यास हस्तांतरणाचा अधिकार, तसेच डिजिटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण (ई–महाभूमी) अंतर्गत संगणकीकृत डिजिटल स्वाक्षरीसह ७/१२ आणि ८–अ उपलब्ध करणे यांचा समावेश आहे. या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांना मोठा आधार मिळाला असून, चळवळीचे शरद पवळे आणि दादासाहेब जंगले पाटील यांनी मुंबईत महसूलमंत्री बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानत सन्मान केला.

यावेळी चळवळीच्या इतर मागण्यांवरही चर्चा झाली. शेतरस्त्यांना हद्द निश्चितीसाठी दगडी नंबरी लावणे, शेतरस्त्यांचे नंबरीकरण, तहसीलदारांना रोड मॉडेल तालुका पुरस्कार आणि तहसील कार्यालयात रस्ता अदालत घेण्याच्या मागण्यांसाठी लवकरच शासन निर्णय घेण्याचे आश्वासन श्री. बावनकुळे यांनी दिले. या बैठकीला महसूल विभागाचे मुख्य सचिव प्रवीण महाजन, राहुल गांगुर्डे यांच्यासह विशेष कार्यकारी अधिकारी सचिन ढोले यांचे मोलाचे योगदान लाभले. शेतकऱ्यांच्या हितासाठी चळवळ आणि शासनाच्या या समन्वयामुळे राज्यातील शेतरस्त्यांचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे.

### संत ज्ञानेश्वर महाराज साहित्य संमेलनाच्या
## स्वागताध्यक्षपदी कवी डॉ. राजेंद्र फंड यांची निवड

**● नगर । वीरभूमी–**
लोककला कलावंत साहित्यिक परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी कवी, साहित्यिक डॉ. राजेंद्र फंड यांच्या निवडीची घोषणा या संमेलनाचे संयोजक साहित्यिक बाबासाहेब पवार यांनी नुकतीच केली आहे. हे साहित्य संमेलन दिनांक १ जून २०२५ रोजी वडाळा महादेव (ता. श्रीरामपूर) येथील त्रिंबकेश्वर सभागृहात पार पडणार आहे.

या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव उपाध्ये हे भूषविणार असून उद्घाटक म्हणून उक्कलगाव येथील ह.भ.प. बाबा महाराज ससाणे हे भूषविणार आहेत. याचबरोबर प्रमुख मान्यवरांमध्ये वासुदेव काळे, सिद्धिविनायक चेअरमन ज्येष्ठ साहित्यिक सायमन भारस्कर, कामगार नेते अविनाश आपटे, रिपाईचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन, काटे स्वामी पतसंस्थेचे चेअरमन अनिरुद्ध महाले, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ महाले, पत्रकार प्रकाश कुलथे, पत्रकार विकास अंत्रे, करण नवले, सरपंच चंद्रकलाताई पवार, चेअरमन धनंजय पवार, संचालक



रामभाऊ कसार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

एकदिवसीय या साहित्य संमेलनात उद्घाटन सत्राबरोबरच परिसंवाद, भारुड, शाहिरी जलसा, चित्रप्रदर्शन, पुस्तक प्रकाशन, गवळणी, दोन सत्रात कविसंमेलन इत्यादी कार्यक्रम पार पडणार आहेत.

साहित्यिक, कवी डॉ. राजेंद्र फंड हे आरोग्य विभागात तालुका आरोग्य सहाय्यक पदावर नोकरी करत असून ग्रामसेवा संदेश या दिवाळी अंकाचे ते सहसंपादक आहेत. गेल्या पंधरा वर्षापासून ते दिवाळी अंक काढून मोफत साहित्यिकांना व साहित्य रसिकांना देतात. याचबरोबर शब्दगंध साहित्यिक परिषदेचे, कार्याध्यक्ष, सहसचिव हे पदे आतापर्यंत भूषविले असून आता ते प्रसिद्धी प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. याचबरोबर अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने घेण्यात येणाऱ्या विश्वस्तरीय लेखन स्पर्धेचे ते स्पर्धा प्रमुख म्हणून ही आहेत. कविसंमेलनाचे आयोजन करणे तसेच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविणे असे कार्यक्रम ते वारंवार घेतात. त्यांचे तीन गीतसंग्रह तर देडगांवचा बालाजी हे धार्मिक पुस्तक प्रकाशित असून याच धार्मिक पुस्तकावर दूरदर्शनने टेलिफिल्म ही बनविली आहे. विश्वस्तरीय लेखनस्पर्धेत कवितेचे रसग्रहण या लेखनप्रकारात त्यांना अनेक वेळ प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहेत. साहित्याबरोबरच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान उपक्रमासाठी कलापथक तयार करून हागणदारी मुक्तीसाठी गावे, शाळा, महाविद्यालय, साहित्य संमेलनात कलापथकाचे कार्यक्रम करून हागणदारी मुक्ती, तंटामुक्ती, आरोग्य जनजागृती केली आहे. लायन्स क्लबच्या माध्यमातून डायबेटिक उपक्रमाचे म्बेसेडर म्हणून कार्य करतांना वर्षभर आंतरराष्ट्रीय स्तरावर टॉपटेनमध्ये राहिले आहे. त्याचबरोबर लायन्स क्लब राहाता सह्याद्रीचे ते चार्टर प्रेसिडेंट आहेत. राहाता शहर स्वच्छता अभियान व वृक्षारोपण मोहिमेत त्यांचा सहभाग आहे. सह्याद्री ट्रेकिंग ग्रुपच्या माध्यमातून दर महिन्याला गड किल्ले चढाई मोहीम, गड किल्ल्यांची स्वच्छता मोहीम, बीजारोपण करण्यात त्यांचा महत्वपूर्ण सहभाग असतो. आजपर्यंत त्यांना राष्ट्रीय, राज्यस्तरीय अनेक पुरस्काराने त्यांना व त्यांच्या साहित्याला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ढाकणे एज्युकेशन संस्थेचे एकनाथराव ढाकणे, गिरीश मालपाणी, लायन्स क्लब राहाता सह्याद्रीचे संस्थापक विनोद गाडेकर व सर्व टीम, संजय उबाळे, शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी, शर्मिला गोसावी, प्रा. अशोक कानडे, सुभाष सोनवणे, ऐश्वर्याताई सातभाई, प्रा. संजय दवंगे, हेमचंद्र भवर, अनिल देसाई, सुधाकर वाघ, सुनील निकम, विलास रोकडे, सागर रोकडे यांनी अभिनंदन केले आहे.

# कर्जतमधील प्राचीन दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरातील अतिक्रमणे हटणार

## जिल्हाधिकाऱ्यांचे उपोषणकर्त्यांना आश्वासन । आ. संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत बैठक

**● कर्जत । वीरभूमी –**

कर्जत येथील प्राचीन दक्षिण मुखी हनुमान मंदीर परिसरा मध्ये अतिक्रमण करून त्या ठिकाणी काही लोक मंदिराचे पावित्र्य नष्ट करत आहेत. तसेच दिवसेंदिवस हे अतिक्रमण वाढवले जात असून यामुळे मंदिर परिसरामध्ये जाण्यासाठी भावी भक्तांना मोठी कसरत करावी लागत आहे. हे अतिक्रमण तात्काळ काढावे या मागणीसाठी शशिकांत बोंगाणे व त्यांची पत्नी स्वाती बोंगाणे आणि शुभम माने हे १४ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले होते. तर या अतिक्रमणा विरोधात कर्जत येथील ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले होते. १६ मे रोजी कर्जत बंद ठेवून कर्जतच्या ग्रामस्थांनी या उपोषणाला पाठिंबा व्यक्त केला होता. आणि कर्जतच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये नगर शहराचे आमदार संग्राम जगताप आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.

अखेर आज जिल्हाधिकारी कार्यालयात




या अतिक्रमण प्रश्नाविषयी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्यासह कर्जाचे प्रांतअधिकारी, कर्जत नगरपंचायतचे कार्यकारी अधिकारी तसेच बांधकाम विभागातील अभियंता आणि कर्जत तालुक्याचे पोलीस निरीक्षक यांच्यासह उपोषणकर्ते तसेच कर्जत मधील हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी नागरिक यांच्यासह चर्चा करून सर्व कायदेशीर बाबी पडताळून सोमवारी अतिक्रमण काढण्याची कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी उपोषणास बसलेले शशिकांत बोंगाणे यांची पत्नी स्वाती बोंगाणे आणि शुभम माने यांना दिल्यानंतर जिल्हाधिकारी पंकज आशिया आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले.

उपोषण सोडल्यानंतर गेल्या १० दिवसांपासून उपोषणास बसलेले शशिकांत बोंगाणे यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की सोमवार पर्यंत सर्व अतिक्रमण काढण्याचे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आम्ही उपोषण सोडत आहोत तर आमदार संग्राम जगताप यांनीही या गोष्टीचा पाठपुरा सुरुवातीपासूनच सुरू ठेवला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या समवेत झालेल्या बैठकीत तोडगा निघाला असून जरी लेखी आश्वासन मिळाले असले तरी जोपर्यंत अतिक्रमण निघणार नाही तोपर्यंत आम्ही त्याचा पाठपुरावा करतच राहणार असे प्रतिक्रिया आमदार संग्राम जगताप यांनी दिली.

# अमृतवाहिनी आय.टी.आय. च्या ५४ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षेपूर्वी नाशिक येथील बंट्स टूल्स कंपनीमध्ये निवड




**● संगमनेर । प्रतिनिधी–**

अमृतवाहिनी आय.टी.आय. अमृतनगर, संगमनेर येथे दिनांक २२ मे २०२५ रोजी बंट्स टूल्स प्रा. लि. नाशिक येथील कम्पनींचा कॅम्पस इंटरव्ह्यू नुकताच पार पडला असून यात ५४ विद्यार्थ्यांची परीक्षा पूर्वी थेट निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य विलास भाटे यांनी दिली आहे.

याविषयी अधिक माहिती देताना भाटे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉ. सुधीर तांबे आणि संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी आयटीआय ने सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य दिले आहे. संस्थेमध्ये नोकरी करिता स्वतंत्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून या विभागाच्या वतीने विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी समन्वय करार करण्यात आला आहे. आणि त्याचाच एक भाग म्हणून आता अमृतवाहिनीच्या ५४ विद्यार्थ्यांची नाशिक येथील बंट्स टूल्स प्रा. लि.नाशिक या कंपनीत निवड झाली आहे.

बंट्स टूल्सचे अतुल पाटील (एच.आर. मॅनेजर), नितीन सहाणे (प्रोडक्शन मॅनेजर) यांनी अंतिम वर्षाच्या मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, फिटर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेडच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या, त्यापैकी एकूण ५४ विद्यार्थ्यांची निवड झाली.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत निसर्गरम्य सुंदर परिसर, अत्याधुनिक सुविधा आणि प्लेसमेंट साठी परिपूर्ण प्रयत्न असल्याने संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या पगारावर थेट नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, विश्वस्त मा. आ. डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राध्यापक व्ही. बी. धुमाळ, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य विलास भाटे आदींनी अभिनंदन केले आहे.

# भाळवणी विविध कार्यकारी सेवा सोसायटीची जिल्हा लेखा परीक्षक मार्फत लेखापरीक्षण व्हावे

## अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने सहकार आयुक्त कार्यालया समोर उपोषणाचा इशारा

**● नगर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील भाळवणी विविध कार्यकारी सेवा सोसायटी मार्फत सहकार अधिनियमाच्या नियमबाह्य कर्ज वाटप केल्याने संस्थेचे जिल्हा लेखा परीक्षक वर्ग एक मार्फत लेखापरीक्षण व वैधानिक तपासणी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यामधील दोषी चेअरमन, संचालक व सचिव यांच्यावर सहकार अधिनियमानुसार गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणी एक महिन्यात कारवाई न झाल्यास सहकार आयुक्त कार्यालय (पुणे) समोर उपोषण करण्याचा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

भाळवणी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सचिव, संचालक मंडळ यांनी जिल्हा बँक शाखा भाळवणी व्यवस्थापक व विकास संस्थेचे ऑडिट यांच्या संगणमताने केले आहे. जिल्हा सहकारी बँकेच्या ठेविदार व सभासदांची फसवणूक करून वरून सदर व्यक्तींनी भाळवणी विकास संस्थेमार्फत कोर्टाचे व इतर संस्थेचे जप्ती आदेश असतानाही बेकायदेशीरपणे आदेशाला केराची टोपली दाखवून चुकीच्या पद्धतीने बेकायदेशीर कर्ज वाटप करण्यात आले आहे. बँकेच्या व संस्थेच्या ठेकेदार व सभासदांची फसवणूक केली आहे.

तसेच इतर कर्जासह पशुपालन कर्जामध्ये शंभर टक्के घोटाळा करून सदर व्यक्तींनी संचालक व कर्मचारी यांनी अफरातफर केली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जप्तीचे व कोर्टाचे मनाई आदेश असताना देखील कर्ज वाटप करण्यात आले आहे. हा आदेश झुगारून त्याची पायमल्ली करण्यात आली आहे. सन २०१९ पासून आजतागायत या गटावर बेकायदेशीर रित्या संचालक मंडळ, सचिव, जिल्हा बँकेचे शाखा व्यवस्थापक, ऑडीटर यांच्या संगनमताने ठेवीदार सभासदांची व कर्जदार सभासदांची वारंवार फसवणूक करून, सदर लोकांनी स्वतःच्या हितासाठी संस्थेची फसवणूक केली असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

सदरील अधिकारी व संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करावे, यामुळे ठेविदार सभासद यांना न्याय मिळणार आहे. या प्रकरणाचा भंडाफोड होण्यासाठी भाळवणी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे जिल्हा लेखा परीक्षक वर्ग एक मार्फत लेखापरीक्षण व वैधानिक तपासणी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# रस्ता अपघातात जखमी झालेल्याचा उपचारादरम्यान मृत्यू

**● नगर । वीरभूमी–**

रस्ता अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा गुरूवारी (२२ मे) पहाटे ३:४८ वाजता मृत्यू झाला आहे. तानाजी संभाजी माने (वय ४५ रा. अकोले ता. माढा जि. सोलापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# गॅलेक्सी नॅशनल स्कूलचा निकाल शंभर टक्के

**● नगर । वीरभूमी–**

वडगाव गुप्ता येथील गॅलेक्सी नॅशनल स्कूलचा सीबीएससी १० वी बोर्ड परिक्षेचा निकाल सलग पाचव्या वर्षी शंभर टक्के लागला आहे. यामध्ये विराज गंडाल ९५.८०%, सूर्यप्रतापसिंह गर्जे ९५.२०%, अनुष्का शेळके ९२.६०%, पलक पांडे ९२.६०%, कृष्णा आव्हाड ९१.६१% व उपासना ढोकचौळे ९०.४५% गुण मिळून उच्च श्रेणी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यंचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेच्या संचालिका देविका देशमुख यांनी दिली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर, सचिव सम्राट देशमुख, प्राचार्य क्षितिजा हडप, राजेंद्र पवार यांच्यासह सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# अमृतवाहिनीतील ईएन्डटीसी इंजिनिअरिंगच्या ५३ विद्यार्थ्यांना नोकरी

**● संगमनेर । वीरभूमी –**

महाराष्ट्रातील गुणवत्तेनुसार उच्च दर्जाचे आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्ये आणि मूल्य शिक्षणाकरिता सातत्यपूर्ण विशेष प्रयत्न करणारे अग्रगण्य अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील एन्डटीसी विभागाच्या ५३ विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर व इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग क्षेत्रातील नावाजलेल्या कंपन्यांमध्ये थेट मुलाखतीद्वारे निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश यांनी दिली. यामध्ये गोदरेज इन्फोटेक, इन्फोसिस, महिंद्रा अँड महिंद्रा, कुक्सन इलेक्ट्रॉनिक्स, जाबील, टीडीके, आशिदा इलेक्ट्रॉनिक्स, फिन सोल्युशन्स, एपिटोम, कनेक्टवेल या सारख्या कंपन्यांनी महाविद्यालयाला भेटी दिल्या.



अमृतवाहिनीतील ईएन्डटीसी इंजिनिअरिंग विभागाने स्थापना (इ. स. २०००) पासून यशाची उज्वल परंपरा जपली आहे. उत्कृष्ट निकाल, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यामधील प्लेसमेंट, आयईईई विद्यार्थी विभागामार्फत नवनवीन विषयांवर कार्यशाळा, सेमिनार, कॉन्फरन्स, चॅप्टर, क्लब, इलाइट विद्यार्थी असोसिएशनमार्फत उपक्रम या सर्वांच्या माध्यमातून ईएन्डटीसी इंजिनिअरिंग विभागाने कार्यक्षम विधार्थी घडवण्याचे काम केले आहे. अशी माहिती ईएन्डटीसी इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ.आर. पी. लबडे यांनी दिली आहे.

या शेक्षणिक वर्षात आत्तापर्यंत ईएन्डटीसी क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट दहा कंपन्यांनी विध्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह घेतले. या प्लेसमेंटच्या तयारीसाठी वर्षभर विविध कंपनीसाठी विशिष्ट प्रशिक्षण, सॉफ्ट स्किल प्रशिक्षण, उद्योजकता प्रक्षिक्षण घेतले जातात. यातून थेट मुलाखतीद्वारे आत्तापर्यंत ५३ विधार्थ्यांची निवड झाली असून यानंतरही प्लेसमेंट सुरु असणार आहेत. विध्यार्थ्यांच्या थेट मुलाखतीसाठी प्लेसमेंट विभागाचे अधिकारी प्रा. प्रवीण वाकचौरे, समन्वयक प्रा. व्हि.आर.आवारे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

थोर स्वातंत्र्य सेनानी, सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात दादा यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी यांच्या मुलांना संगमनेर मध्येच रोजगाराभिमुख उच्च तंत्रशिक्षण मिळावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांनी स्वयंपूर्ण व्हावे या उद्देशाने सन १९८३ या वर्षी अमृतवाहिनी इंजीनियरिंग कॉलेजची स्थापना केली. अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालात गुणवत्ता सतत वाढविण्याकरिता संस्थेचे अध्यक्ष मा. मंत्री आ. बाळासाहेब थोरात आणि मा. आ. डॉ. सुधीरजी तांबे नेहमी आग्रही असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी महाविद्यालयाने सतत उत्कृष्ठ निकाल व प्लेसमेंट यामधून गुणवत्ता जपली आहे. यामुळेच राज्यात, देशात महाविद्यालय अभियांत्रिकीच्या शिक्षणाकरिता हब झाले असून विद्यार्थ्यांची ओढ अमृतवाहिनीकडे वाढत आहे. एन.बी.ए.चे चारवेळा मानांकन, नॅकचा ए प्लस दर्जा, आय. एस. ओ.चे सतत मूल्यमापन आणि विविध संस्थांमधील सर्वेनुसार राज्यात व देशात महाविद्यालय अव्वल स्थानावर आहे. विश्वस्त शरयुताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकॅडमिक्स डॉ.जे.बी.गुरव, प्राचार्य डॉ.एम.ए.व्यंकटेश, रजिस्ट्रार प्रा. व्ही.पी. वाघे यांचेकडून याबद्दल कौतुक होत आहे.

# शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दहावीच्या बोर्ड परीक्षेत भक्ती अजिनाथ कुंढारे प्रथम

**● शेवगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या फेब्रु/मार्च २०२५ च्या माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाइन जाहीर झाला असून प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली.



विद्यालयातील एकूण ७८ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाले होते, शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयात कु. भक्ती अजिनाथ कुंढारे हिने ९५.८० टक्के गुणाने प्रथम क्रमांक मिळवला. यश अनिल सुपारे याने ९३.८० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक व गणित विषयात ९९ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. आदर्श नारायण भगत याने ९३ टक्के गुण मिळवत तृतीय तर विज्ञान विषयात ९९ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.

स्वानंद सचिन झोटींग याने ९१.८० टक्के गुण मिळवत चतुर्थ तर अक्षरा सिमोन मगर हिने ९०.६० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला. विद्यालयातील प्रविष्ठ एकूण ७८ विद्यार्थ्यपैकी ५ विद्यार्थ्यांनी शेकडा ९० गुण मिळवून विशेष प्राविण्य, १४ विद्यार्थ्यांनी शेकडा ८० गुण मिळवून अतिउच्च श्रेणी तर २७ विद्यार्थी उच्च श्रेणी व २९ विद्यार्थी प्रथम श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाले.

यासर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र विखे पाटील, सहसचिव मोनिकाताई सावंत, विश्वस्त ध्रुव राजेंद्र विखे पाटील व कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर त्याचप्रमाणे प्राचार्या वर्षा दारकुंडे, उपप्राचार्य रमेश कवडे व महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शेवगाव परिसरातील ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.